म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१८२

# आम्ही पाहिली मुंबई



REFBK-0020048
REFBK-0020048

सन्त भोजराज

२९८२ काव्य

२००४८
२३।११।८४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००४८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम २००४८ वि: काव्य
क्रमांक २१८२ दि. 23/[illegible]

# आम्ही पाहिली मुंबई

कविता संग्रह

REFBK-0020048
REFBK-0020048

संत भोजराज

प्रथमावृत्ती १९७३

किंमत दोन रुपये

प्रकाशिका :

**सौ. विमल भागवत राणे**
" अशोक प्रकाशन "
सावदा, जि. जळगांव.

◆ ◆

मुखपृष्ठ चित्रकार :

**न. द. सपकाळे**
जी. डी. आर्ट, ए. एम्.

◆ ◆

अनुवाद, नृत्यीकरण, ध्वनीमुद्रण, नभोवाणी,
वितरण आदि हक्क कवीचे स्वाधीन.

◆ ◆

मुद्रक :

**अनिल चौधरी**
अनिल प्रिंटर्स, फैजपूर
जिल्हा जळगांव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

● ● ●

# अर्पण-पत्रिका

मुंबई कुणाची ? हा प्रश्न उपस्थित करतांना मुंबईवर हक्क शाबीत करणारे दोन लोक आढळतात. मुंबईचे बाह्यांग भटजी, शेटजी, राजकारणी धोरणी सजवितात. हे सारं जगाचे कल्याणा करितांच आहे. असं म्हणण्याचा अधिकार त्यांना पोहोंचत नाहीं. हा सारा अट्टाहास सत्ता, संपत्ती, प्रसिद्धी, प्रचाराकरितां आहे. राजसांचा, असंतांचा, अभक्तांची, पुढाऱ्यांची, पेंढाऱ्यांची मायावी भाषा, आवाज आता संत ओळख् ल।गले आहेत. मूठभरांचे सोयीसाठी लाखोंची गैरसोय करणं, मुंबईत देव नाही, धर्म नाही जाहीर करणं, मुंबई शेटजीची म्हणून व्यासपीठावर भरमसाठ बोलणं, मुंबईत दंगा झाला, आग लागली, सरकारवर टीका करणं, स्वतःला नामानिराळे संबोधतांना धुतल्या तांदळासारखं समजणं, श्रमिक संतांची दिशाभूल करणं, संतच नाहीत समजून स्वतः संत

बनणं, अँबेसडर, फियाट कारमधून स्वतःला मिरविणं, मुंबईचे शेटजी भटजींनी बेशरमीचा बुरखा घालून " तो मी नव्हेच " असे भासविण्याचा जनांना शो दाखविला. लोंकशाहीत सदर नाटकाचा प्रयोग फसला आहे. मुंबईची प्रगति भटजी शेटजींचे लिखाण भाषण, हवेली माडी, मोटार गाडी निवडणुकी जिंकणं, निधर्मातून धर्म वर्णन करणं, भूतकाळातून, भविष्य-काळांतून मुंबईचा इतिहास सांगणं, श्रमिक संतांना बनविणं, फसविणं, लुबाडणं, ह्यात नसून श्रमिक सामान्याचे मनगटांत, पायाचे शक्तीत, हृदयांत वास करीत असलेले देवाचे भक्तीत आहे. पुढाऱ्यांना आज पटत नसलं तरी त्यांचंपण हीत धर्मी बनण्यावर आहे.

मुंबईचे अंतरंग, मुंबईची शान, मुंबईचे बाह्यांग, मुंबईतील उत्पादन, उत्पादनांतील वाटप, मुंबईची प्रगति, भारताचे मोजमाप, मुल्यमापन, वजन ठरते. मुंबईवरील भाव हाच भारतवासियांचा आनंद ठरतो. अशा मुंबईची घडण तिला लावलेले वळण तिच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी कांही प्रसिद्ध परांगमुख आत्मे धडपडत आहेत. त्यांना सरकार ओळखू शकत नाहीं. संत भोजराज त्यांना संतच मानतात. त्यांचेच हातचा प्रसाद खाऊन संत भोजराजांचा पिंड पोसला आहे. त्यांचेच स्वागतानं संत भोजराजांनी आनंद सुख भोगले आहे. अशा संतांचा संत भोजराजांना विसर पडणार नाही. त्यांचेच चरणी आपुला कविता संग्रह "**आम्ही पाहिली मुंबई**" प्रेमभक्ती भावानं अर्पण करितात.

संतदास

**संत भोजराज**

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम 20058 वि: ...
क्रमांक 2162 नों दि: 23

# निवेदन

संत भोजराजांचा जन्म दि. १८-२-१९१७ रोजी खिरोदे येथे झाला. बालपण सावदे गांवी गेले. मराठी शिक्षण हायस्कूलपर्यंत सावदे येथेच झाले. पोटासाठी पोलीस खात्यात नौकरी केली. आता सेवानिवृत्त, संसारांतून अलिप्त, मायेतून मुक्त झाले आहेत. संसार ४१ वर्षे झाला. संसारात सुख लाभले म्हणून स्वतःला भाग्यवान समजतात. सहा भाषा जाणतात. मराठी, हिंदी, उर्दूतून लिखाण करितात. इंग्रजी, संस्कृत, गुजराथी भाषेतून वाचन केले आहे. आतापर्यंत ५० पुस्तकें लिहिली आहेत. संत भोजराज भारतीय टीकाकार ठरतात. धर्म राजकारण, सामाजिक सुधारणा हे तिन्ही भाग सहजगत्या हाताळतात. राजस तामस, पंत जंत, श्रीमंत पंत. भटजी शेटजी साहित्यिकांवर टीका करितात. संत भोजराज साहित्यसम्राट आहेत. महाराष्ट्रांतील ग्रामीण भागांतील पहिले यशस्वी प्रकाशक आहेत. उत्तम गायक आहेत. महाराष्ट्रांतील १५ लाख लोक त्यांना ओळखतात. संत साहित्याचाच प्रचार करतात. सर्वस्व देवालाच अर्पण केल्यानं शेवटचा श्वास रक्ताचा थेंब हरिभक्तींत घालवायचा हा अंतीम हेतू आहे. संत भोजराजांना कुणाला कांही मागायचं नाही, द्यायचंपण नाही. कुणाबद्दल शत्रुत्व, मित्रत्व उरलेलं नाही. त्यामुळं कुणाला ओळखता आलं नाही तर भलताच घुस्सा करण्याचं कांही कारण नाही.

संत भोजराजांनी १९६९ साली मुंबईत चर्चगेटला सी. आय. डी. त फौजदार म्हणून नौकरी केली. सुटीचे, रजेचेवेळी मुंबईतील थोर प्रसिद्ध पुरुष कलाकार, कलावन्त; पुढारी मिनिष्टर, सेशन जज्ज, सनदी नौकर वर्ग, एम्. एल्. ए. एम्. एल्. सी. पोलीस अधिकारी, पदवीधर पदकधारी

डॉक्टर्स, डॉक्टरेट, वकील, आचार्य, प्राचार्य, संपादक, उपसंपादक, स्तंभलेखक ह्यांच्या गाठीभेटी घेतल्या. संत साहित्त्याबद्दल चर्चा केली. आपल्या घरी पाहुणा आला तर त्याचं स्वागत करतात. साधु संत येता घरां दिवाळी दसरा साजरा करतात. असं कांही आढळलं नाही. संत भोजराज संत आहेत. ज्ञानी आहेत, साहित्यसम्राट आहेत. स्वागत करावंसं वाटलं नाही. सर्वांचे कपाळावर तिसरा डोळा चमकत होता. शिर ताठ दिसत होती. जो तो घड्याळाकडे बघत होता. कुत्छीतपणानं हसणं, चूक काढणं, चूक दाखविणं, उपदेशी समजून उपदेश करणं, मानभावीपणानं हसणं. पुढारी, मायबाप समजून आश्वासन देणं ! असाच शिरस्ता दिसला. संत भोजराजांना मंत्री महामंत्री, पुढारी थोर साहित्यिक ह्यांना कांहीच मागायचं नव्हतं. त्यांना द्यायचपण नव्हतं. मंत्री, थोर पदाधिकारी ह्यांना वाघ, सिंहाची उपमा देतात. गाय म्हणून भीतीपण वाटली नाही. सारे सरकारचे तंबूतील ताबूतचें खिचळी मागणारे वाघच वाटले.

संत भोजराजांनी बंदोबस्तसाठी, नौकरीनिमित्त मुंबई पायी, उपाशी पोटी, पोटभरून, बस, लोकल, टॅक्सीमधून पाहिली.

जे न देखे शेटजी रवि ते देखे भटजी कवी. जे न देखे दरबारी भाट कवी ते देखे संत रवि. ह्या डोळस नजरेनं पाहिली.

भारत कुणाचा ? त्याचप्रमाणं मुंबई कुणाची ? हा प्रश्न जेव्हा उपस्थित होतो. तेव्हा मुंबईचे जो वर्णन करील मुंबई त्याचीच उत्तर समर्पक ठरते. आतां मुंबईचे राजस तामसांनी म्हणजेच भट-भिक्षुकांनी, राजकारणी धोरणी लोकांनी भरपूर वर्णन केलेलं आहे. श्रमिक संतांची नजरच वेगळी त्या नजरेतून संत भोजराजांनी मोठ्या कुशलतेनं मुंबई दाखविली आहे.

मुंबई म्हटली म्हणजे कौन्सील हॉल, सचिवालय, हायकोर्ट इमारत, आय्, जी. पी. ऑफीस, गव्हर्नर बंगला, मलबार हील, चौपाटी, नरीमन पॉईंट, इंडिया दरवाजा, वाळकेश्वर, भाभा इंस्टिटयूट, केमिकल अनलायझर जे. जे. हॉस्पिटल, विद्यापीठ, ताजमहल हॉटेल, सरदार लॉज, मेट्रो, नाझ, रॉक्सी, रविंद्र मंदिर, बिर्ला हाऊस, रंग भवन, टाईम्स ऑफ इंडिया, बोरीबंदर, फोर्ड, चर्चगेट, राजाबाई टॉवर, जहांगीर आर्ट गॅलरी, होळ

मैदान, आझाद मैदान, राणीचा बाग, म्युझियम, मत्स्यालय, केळेवाडी, भायखळा, दादर येथील ग्रंथालय, हाजी मलंग, महालक्ष्मी देवालय, भटजीचे पोरांचे पायांतील चाळ, शेटजींचे कारखाने, फॅक्टरी चाळी ही मुंबईत येतात.

संत भोजराजांना मुंबईचं बाह्यांग मुळीच आवडलं नाही जे नाशवंत त्याबद्दल आदर नाही. मुंबईचं अंतरंग बघतांना मात्र त्यांना सौख्य, आनंद, शांती लाभली. मुंबईतील श्रमिक, सामान्य, संत जनांनी त्यांचं जे स्वागत केलं त्याचा विसर पडणं शक्य नाही. त्यांचेच स्फूर्तितून त्यांनी **"आम्ही पाहिली मुंबई"** हा कविता संग्रह हंसत खेळत तन्मयतेनं लिहिला. नव्हे ! मुंबादेवीकडोन लिहून घेतला.

पोलिस खात्याबद्दल मुंबईचे नागरिकांना फारसा आदरभाव नसला तरी पोलीस बंदोबस्ताचे वेळी मुंबईकर जे धैर्य दाखवितात. कायदा पालन करतात, सहनशीलता बाळगतात, शांततेसाठीच झटतात त्याबद्दल संत भोजराज धन्यवाद जाहीर करतात.

महाराष्ट्र मुंबईची फारकत झाल्यानं मुंबईत अमुलाग्र बदल झाला पाहिजे. मुंबईचे बाह्यांगापेक्षा मुंबईकरांचं अंतरंग सुशोभीत सुंदर, प्रेमळ, मायाळू, त्यागी, परोपकारी झालं पाहिजे, संत भोजराजांचा कविता लिहिण्याचा हाच उच्च हेतू आहे. संत भोजराजांची विठ्ठलावर गाढ श्रद्धा आहे. पांडुरंग संताकरवी कार्य करून घेईल विश्वास वाटतो.

संत भोजराजांची अकरावी साहित्यकला कविता संग्रह "आम्ही पाहिली मुंबई" महाराष्ट्रांतील रसिक जन, राजहंस वाचक स्वागत करतील भरवसा वाटतो.

संत भोजराजांचे साहित्य वाचल्याशिवाय त्यांचेबद्दल आदर वाटणार नाही. संत भोजराजांचे साहित्य विकत घ्या ! नम्र विनंती आहे.

**अशोक प्रकाशन, सावदा**

जिल्हा जळगांव (महाराष्ट्र)

# अनुक्रमणिका


१ आम्ही पाहिली मुंबई
२ आम्ही जातीचे ब्राम्हण
३ आम्ही कविता करितो
४ नभोवाणीला वाणी लाभले
५ शिष्ट भारताची प्रगति खुंटविणार
६ तुकारामला वदति सखाराम
७ आमुचे बापजादे
८ श्रीरंगा पांडुरंगा
९ करितात शृंगार साज
१० देव हृदयांत लपला आहे.
११ राजसाँची लोकशाही
१२ शेटजी राज्य प्रचारक
१३ पांडुरंगच डोळा
१४ नारायणराव
१५ कावळे-बगळे
१६ या हो ऽ घ्या ऽ
१७ देह गेला पैलतीरा
१८ भारत हा धर्मियांचाच राही
१९ श्रमिकांचाच भार वाही
२० ईश्वर हीच साक्ष एकमेव
२१ ज्ञानाची पायरी
२२ वाढवा श्रमिक पंथ
२३ आज स्वातंत्र्य दिन
२४ आम्ही कोण ?
२५ गोकुळ अष्टमी
२६ पेटली ज्योत मम अंतरी
२७ लोकशाही ब्रम्ह
२८ तेथेच दिसेल ज्ञान प्रकाश

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
20048 वि: काव्य
2968 23/9/90

# १ आम्ही पाहिली मुंबई

आम्ही पाहिली मुंबई. मुंबापुरी, मायानगरी श्रमिक नजरेने ॥
जवळलांब, भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥१॥

देहाची आसक्ती, आत्म्याची तृप्ती जगणें मान ॥
अपमानाने ॥

दगडाचें बनलों देव, देवाचें दगड, मंदीर फूटपाथचे ॥
पैशाचे घावानें ॥ २ ॥

वैष्णव बाजारी चालतो काळा बाजार ईमानदाराला ॥
येतो आजार ॥

इंग्रज भाषिक रहातो मजेदार, मराठी भाषिक ॥
कामाने बेजार ॥ ३ ॥

श्रम, श्रमिक, उत्पादन, शक्ति बुद्धीचा दिसतो ॥
खेळ खंडोबा ॥

पायापेक्षां डोक्याला भाव, हरामखोरालाच ॥
वदतात आजोबा ॥ ४ ॥

मद्रास, पंजाब, बंगाल, गुजराथचा बडेजाव मराठा ॥
दिसतो लाचार ॥

शेटजी राज्यासाठीं भटजी शिल्पकार मालक एक ॥
बाकी गुलामांचा बाजार ॥ ५ ॥

मराठी भाषा नावडती, इंग्रजी आवडती डोक्यावर ॥
बसली आहे ॥
सनातन्यांचे होम हवन पश्चिमेचा भटजी वेदमंत्र ॥
इंग्रजीतून गात आहे ॥ ६ ॥

नच कष्टावर श्रद्धा, प्रेमभक्तीचा अभाव दिसते सारी ॥
दादागीरी ॥
फसवा फसवीचा कळस उंचच उंच ईमारती फोर्ट ॥
वाळकेश्वरी ॥ ७ ॥

येथे पाप.पुण्याची चढाई चालतो सुख दुःखाचा सोस ॥
कोण हंसतो कोण रडतो नच कुणी बघतो जो तो ॥
भोगतो भोग ॥ ८ ॥

आजचा अमीर उद्याचा फकीर बुवा तेथे जमती ॥
बाया ॥
चौदा भाषिकांची भाषा एकच बोलणें. फॅशनने दिसते ॥
उघडी काया ॥ ९ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी, श्रमिक नजरेने ॥
जवळलांब भरपेट, उपाशी पोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ॥

श्रीखंडपुरी ईडली डोसा खिमा. चाप रहातो ॥
पापलेट मसाला ॥
पोटांत पडतांच भर खाणारा समजला जातो ॥
मुंबईवला ॥ १० ॥

मुंबईचे हवापाणी पचतांच मनुष्य दिसतो ॥
मुलखावेगळा ॥
सुख-दुःखाचा अनुभव गुलाबी गालांवर दिसतो ॥
आनंद आगळा ॥ ११ ॥

येथे संसाराला चव नाहीं. पाऊला गणीक सत्कार ॥
पेरला आहे ॥
श्रीमंत व्यापाऱ्याला भाव आहे. गरिबाला पण ॥
वाव आहे ॥ १२ ॥

काय खावं अन्न, मेवा मिठाई फळाचे नित्य प्रकार ॥
जागतीक आहे ॥
उधारीला तडजोड नाहीं रोखीला बकरीचे तोंड ॥
जोडले आहे ॥ १३ ॥

येथे भाषेवरून जात ओळखणं कठीण. पोषाखावरून ॥
धर्म मुष्कील आहे ॥
संत असंत वाद गुप्त आहे. असंत संतांचे टाळूवरील ॥
लोणी खात आहे ॥ १४ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी श्रमिक नजरेने ॥
जवळलांब, भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥ धृ ॥

येथ श्रमिकांची भाषा सरळ सोपी आहे. शिष्टांची ॥
फसवी आहे ॥
पुढारी नर श्रमिकांना बनवून वानर मुंबई ॥
जाळीत आहे ॥ १५ ॥

शिवसेना, श्रमिकसेना येथे चालतात चालकांच्या ॥
तालासुरानें ॥
ज्याला जेथे भाव नाही तेथे अभाव कधी रोख सदा ॥
उधार अंध श्रद्धेने ॥ १६ ॥

येथे कुणालाही उपदेश करुं नये कारण संतांचा अभाव ॥
पुढाऱ्यांचा प्रभाव आहे ॥
खिसा कापणें, गळा कापणें ज्याला अवगत त्याला ॥
भलताच भाव आहे ॥ १७ ॥

जो तो धांवत पळत सुटतो देव जाणें कसली धाई ॥
कसली कमाई ॥
शेजारी शेजाऱ्याला ओळखेन तर शपथ खिसा कापला ॥
येते अवाई ॥ १८ ॥

चोर ! चोर ! एकच कल्लोळ गर्दी जमतांच धांवत येतो ॥
सखा सखाराम ॥
पाकीट पैसा पडतांच हातांत खेडयाचा खेडवळ वदतो ॥
अहो ऽ संत तुकाराम ॥ १९ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी, श्रमिक नजरेने ॥
जवळ लांब भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ॥

येथे पोलिसांना काम, नच आराम रात्रीचाच दि[illegible] ॥
[illegible]ला आहे ॥
कानाला चिकटला फोन, हातात झरणी दंगा धा[illegible] ॥
कटक[illegible]हे ॥ २० ॥

येथे भांगपट्टी वरती, कलाल भट्टी खालती मध्यें ॥
सख्याहरी उभा आहे ॥
माळेचे मणी ओवले आहेत. शेटजीचा धागा भटजी हाती ॥
जपमाळा आहे ॥ २१ ॥

मोर्चा, प्रेत यात्रा, लग्नवरात एकत्रच लाखो चालतात ॥
डाव्या बाजूने ॥
पोलीस शिपाई वर खोक्यावर वधूचे गाली लाली येते ॥
हाताचे ईशाऱ्याने ॥ २२ ॥

यथे कायदे भंगाला भंग नाही. दोष पत्रांत आरोप ॥
नोंदला आहे ॥
वकिलाचें फी शिवाय सुटका नाही. कबुली जबाबाला ॥
शिक्षा आहे ॥ २३ ॥

कोण चोर ! कोण शहाजोग येथे डोके लावणें ॥
कठीण आहे ॥
संपवाले, सत्त्याग्रहींना मान पोलिसांना नेहमीच काम ॥
अंदाधुंदी आहे ॥ २४ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी, श्रमिक नजरेने ॥
जवळ लांब, भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ॥

जात, जातियतेचा दिसतो सुकाळ श्रीमंतांना मानव धर्म ॥
कर्दनकाळ ॥
धर्म अधर्माचा बनतादूत तयाला राजकारणी वदतात ॥
मुंबापुरीचा सुपूत ॥ २५ ॥

शेटजीचें पत्र,भटजीचा अग्रलेख, राजाचा विजय ॥
राणीचा नाच ॥
सत्तेचा शहाणपणा, मोठ्यांचा मोठेपणा साऱ्यांचा ॥
गरिबांना जाच ॥ २६ ॥

व्यासपिठावर पक्षांधानें बोलावें फटकळ पणालाच ॥
पूर्णभाव ॥
भाषणांत नच अर्थ सारा अनर्थ पुढारी पेंढारीच ॥
घेतात सोन्याचा भाव ॥ २७ ॥

मुंबईचा शेटजी सकाळचा नास्ता घरीं लंच दुपारी ॥
दिल्लीला घेत आहे ॥
कलकत्त्याचीं हुंडी वटतांच, रात्री शेटाणीचें पाशांत ॥
निद्रा घेत आहे ॥ २८ ॥

मुंबईची प्रगति सोन्याने सोनेरी अशांततेचे शांततेशीं ॥
लग्न लागले आहे ॥
राग, द्वेष, लोभ, भोग, चैन वाढत आहे. स्त्री पुरुष भेद ॥
संपला आहे ॥ २९ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी श्रमिक नजरेने ॥
जवळलांब, भरपेट, उपाशींपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ॥

निवडून आला त्याचा काळ पडला त्याचे काळे ॥
मुंबईला धक्के फार ॥
शेटजी लोभांतून घडतो संप भटजीचे किमयेत ॥
संपाचा बेडा पार ॥ ३० ॥

पैशावर लाभतो पैसा श्रीमंती प्रसिद्धी ठिकाणींच ॥
नमस्कार ॥
सचोटीची घेतां कसोटी हरिश्चंद्र तारामतीला ॥
करितो ठार ॥ ३१ ॥

भारतिय नद्या गंगा, सिंधू, ब्रम्हपुत्रा, गोदावरी, कावेरी ॥
नर्मदा तापी आहे ॥
टेम्स, मिसीसीपी, होलगा, होयांगहो, नाईल मुंबईचे ॥
खाडीत आहे ॥ ३२ ॥

हजारो परदेशी, मुशाफीर मुंबईत जमतात रमतात ॥
जाहिरात बाजीने ॥
चैन, भोग, आनंद भोगतांना होतात चॅट सफाईने ॥
सफाचट झाल्याने ॥ ३३ ॥

येथे गल्लीत भट, भिक्षूक, गारोडी, मवाली, सिंगर ॥
भिकारी दिसतात बेकार ॥
राजे राजशाही हॉटेलात होता सत्कार कॅबरे नृत्यांत ॥
धुंद होती अपार ॥ ३४ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी श्रमिक नजरेने ॥
जवळलांब, भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ ॥

मुंबईत शिक्षेसाठीं शिक्षण आहे. भिक्षेसाठी पदवीची ॥
झोळी आहे ॥
सत्ता संपत्ती संचय भूषण आहे बेकार बेकारीला ॥
दूषण आहे ॥ ३५ ॥

येथे तत्वासाठी तत्वज्ञान तत्ववेत्त्यासाठी भरपूर ॥
दान आहे ॥
श्रमिक सामान्यासाठीं अज्ञान उडत्या गोमाशांना ॥
मान आहे ॥ ३६ ॥

शिक्षणांत अमुलाग्र बदल झाला पाहिजे ? शासनाचीच ॥
री परंपरा आहे ॥
शिक्षण म्हणजे काय ? वरती झाले पाय ? विधान सभा ॥
पांढरे कोड कोडे आहे ॥ ३७ ॥

येथे मनुष्यापेक्षां यंत्राला भूक खायला प्यायला भरपूर ॥
तेलपाणी आहे ॥
उपाशी पोटी मरणं, मरू, नये म्हणून जगणं जीवन ॥
रहाट गाडग आहे ॥ ३८ ॥

येथे देहाला मोल नाहीं. मौतला कफन नाहीं ॥
खांदा कुणाचा वाद नाहीं ॥
प्रेत कुणी खांद्यावर न्यावयाचं मुळींच भांडण नाही ॥
बेवारस करितां शववाहिका राही ॥ ३९ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी, श्रमिक नजरेने ॥
जवळ लांब, भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ ॥

कोणी कुणासाठी रडावं रडणं ठाऊक नाही. रडतां ना ॥
डोळ्यांना पाणी नाही ॥
मोले घातले रडाया किती वेळ रडायचं पैशावरच ॥
अवलंबून राही ॥ ४० ॥

येथे किडा मुंगी पेक्षा मनुष्य देह मौलीक, पूजनीय ॥
ठरत नाहीं ॥
साहेबाचें माकड, कुत्रे, सशाकरितां गुरांचा डॉक्टर ॥
गरिबा करितां औषध नाहीं ॥ ४१ ॥

येथे श्रीमंतासाठी रंगमहाल आहे. गरिबा करिता ॥
आकाश, फुटपाथ आहे ॥
शेटजींचा माल खारा, मीठा श्रमिक मजुरासाठी ॥
चणे, दाणें फुटाणें आहे ॥ ४२ ॥

इंद्राची इंद्रपुरी शेटजींची मुंबापुरी भटजींची माया नगरी ॥
स्वर्गसुखा करितां ॥
येथे गातात गंधर्व नाचते रंभा शेटजी कल्याणाकरिता ॥
भटजी पोटाकरिता ॥ ४३ ॥

मुंबई जळत आहे. जाळणारे कोण ? तेंच आरडा ओरड ॥
करित आहे ॥
पुढारी ढेकर देत बेंबी चोळीत आहे. अग्निशामक, रक्षक ॥
हकनाक मरत आहे ॥ ४४ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी, श्रमिक नजरेने ॥
जवळ लांब, भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ॥

येथे शेटजींचा आवाज आज रोख उद्या उधार – – – – –
विषमतेचाच आहे ॥
श्रमिकांचा आवाज आज रोख सदा उधार उदार ॥
समतेताच आहे ॥ ४५ ॥

येथे शेटजी भटजींची भाषा सारखी मुंबई महाराष्ट्राची ॥
फारकत झाली आहे ॥
सारे शासन , धर्म हिसेंत, प्रेम नटीत, जीवन ॥
लॉटरीत गुंतले आहे ॥ ४६ ॥

येथे सट्टारेसेससाठी बापकमाई आहे. आपकमाई ॥
मटक्यासाठी आहे॥
हरिपासाठी नंगानाच गरिबासाठी भाऊचा ॥
तमाशा आहे ॥ ४७ ॥

शेटजीचा प्रचार भटजीहाती रेडिओ पेशवाईच ॥
थाटाचा आहे ॥
शिवशक्ती, शीवभक्ती टोपण नांव कबजीचे कबजांत ॥
गांव आहे ॥ ४८ ॥

मुंबईत श्रमिकांना घटदिवस पुढाऱ्यांचा वाढदिवस ॥
साजरा होत आहे ॥
राजपक्ष धर्म पंथाची बुवाबाजी सारे लार्ड शासनाचे ॥
आजोबा आजी आहे ॥ ४९ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी श्रमिक नजरेने ॥
जवळ लांब, भरपेट, उपाशीपोट , बस लोकल अनवाणी पायाने॥धृ॥

येथे देव मनुष्यात नाहीं तो जात, धर्म, रुढीचे भावनेंत ॥
लपला आहे ॥
लाखो श्रमिक उपाशी सारे अडाणी, देव संतांनांच ॥
दोष देत आहे ॥ ५० ॥

येथे दंगा धोप्याचा सुकाळ तडजोडीला खूप॥
काळ लागत आहे ॥
डोके फिरूला विस्तवाचा डाव शहाण्याचे कांद्यांना ॥
सोन्याचा भाव आहे ॥ ५१ ॥

जातीवंत चित्रकार चितारी आहे. मानवी देहाला रंगवितो ॥
कुंचल्याने ॥
सप्त रंगात भरतो जडात्मा उमटते प्रतिबींब प्रसिद्धी ॥
पैशाचें रुपाने ॥ ५२ ॥

मुंबईत श्रमिक प्रचाराचे वावडे भटजी दरबारी भाटाला ॥
पदक पद्मश्री आहे ॥
आजची सुन उद्याची सासू उतावळा सो ॥
बावळा आहे ॥ ५३ ॥

येथें गिऱ्हायीकांचे मनांत माल ठसला आहे. व्यापाऱ्याने ॥
त्याला घेरले आहे ॥
नवे घ्या ! सोने द्या ? शेटजी राज्याला गांधीराज्य ॥
रामराज्य नांव आहे ॥ ५४ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी मायानगरी, श्रमिक नजरेनें ॥
जवळ लांब, भरपेट उपाशीपोट,बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ॥

येथे मानव कलेपेक्षां परमेश्वर कृती, निर्मीती खूप ॥
चालती बोलती आहे ॥
रंग, रुप, वेषभूषा, चाल, आवाज बोल, हावभाव ॥
समतोल आहे ॥ ५५ ॥

फूटपाथ, मोटार, बस, लोकल, रंगभूमी, सभा, विद्यालय ॥
मंदीरात सौंदर्य आहे ॥
डोळ्याचे पारणें फेडायचे म्हटलं तर प्रेमाचें दुर्बीणीतून ॥
बघणं शक्य आहे ॥ ५६ ॥

स्त्री सौंदर्य सुंदरतेने बघण्याचं असतं स्पर्शाला सक्त ॥
मनाई आहे ॥
विनयभंग, जबरीला जबर शिक्षा धक्का धक्कीला ॥
मंदस्मीत, सॉरी आहे ॥ ५७॥

येथें कोणीतरी फसवीत आहें. भास होतो ठग नाही ॥
आभास ठरतो ॥
चिंतन मननाला वेळ नसतो, सद्‌गुरुचा शोध करण ॥
वेळ फुकट जातो ॥ ५८ ॥

येथे आजारी रोगराईला.आमंत्रण रोगी बचावतो ॥
नर्सचे हातचे औषधाने ॥ ॥
दवाखान्यांत जो वाचला घरी नच परतला समजा ॥
मेला अपघाताने ॥ ५९ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी, श्रमिक नजरेने ॥
जवळ लांब, भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ ॥

येथे लुळ्या पांगळ्याच्या पायाला भिंगरी आंधळा ॥
गातो गोड गळ्याने ॥
रसिकांचे पांग फिटतात अंध महाविद्यालयांतील ॥
म्युझीक वाद्याने ॥ ६० ॥

येथे हॉटेलांत टींप देणारा सभ्य ! न देणाराला असभ्य ।।
मानले आहे ।।
टाप टीप वाल्याला सलाम येळच्या गबाळच्याचा अपमान ।।
ठेविला आहे ।। ६१ ।।

मुंबईत कुणीतरी हंसतांच हसावं ! हातवारे करितांच
ईशारा करावं ।।
स्मृतिकारांनी आठवणीची गाजर खावं ! विस्मृतीकारांनी ।।
मनांत हळहळावं ।। ६२ ।।

मुंबईचा मवाली, पुण्याचा भामटा संघटणा ।।
कल्याणला आहे ।।
कधी कधी वॉलकट, खूनी राघवन सांपडतांत ।।
जेल फाटक खुले आहे ।। ६३ ।।

विज्ञानांतून ज्ञानाची पढाई, प्राचर्यांची बढाई ।।
वैमानिकांची चढाई ।।
शेटजी भटजीसाठी कढाई सरकारची सदा ढिलाई ।।
श्रमिकांत दिसते लढाई ।। ६४ ।।

आम्ही पाहिलीं मुंबई मुंबापुरी मायानगरी श्रमिक नजरेने ।।
जवळलांब भरपेट उपाशापोट बस लोकल अनवाणी पायाने ।। धृ ।।

मलबार हिल, फोर्ट, नरीमन पाईंट, गिरगांव ज्याने पाहिली ।।
ती मुंबईच राही ।।
भेळ. पाणीपुरी, नारळपाणी, कोकाकोला फंटा प्याला नाही ।।
तो मुंबईचाच नाही ।। ६५ ।।

कोठे जायचे बस लोकल मार्ग मुंबईवाला पण मुंबई ॥
जाणत नसतो ॥
भाषेचा अर्थ न समजल्यानं प्रत्येंकजण एकमेकांवर ॥
गुरगुरत असतो ॥ ६६ ॥

येथे धर्मांचे थोबाडीत राजपक्ष धर्मपंथानं देतांच ॥
सुधारणा रडत आहे ॥
ज्याचे जवळ पैशांचा साठा करितो पुरवठा त्या समोर ॥
प्रधानमंत्री उभे आहे ॥ ६७ ॥

येथे पंडितजी टपरीवर पान शास्त्री फुटपाथवर ॥
वर्तमानपत्र विकीत आहे ॥
लक्ष्मीचे हातात झाडू लक्ष्मीकांत नगरपिता होतांच ॥
बेवडा पीत आहे ॥ ६८ ॥

मुंबईत उच्चभ्रू करिता स्वर्ग सुगंध आहे श्रमिका करितां ॥
नर्क दुर्गंध आहे ॥
मूठभरांची सोय लाखोंची गैरसोय लोकशाही ॥
नावाचीच आहे ॥ ६९ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी, श्रमिक नजरेने ॥
जवळ लांब, भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ॥

येथे चैनी भोगी करितां रंभा मेनका ! गरिबाकरितां ॥
साळुंकी, कोकीळा आहे ॥
श्रीमंतांची अब्रू झाकल्या मुठींत गरिबांची अब्रू ॥
उघडयावर पडली आहे ॥ ७० ॥

येथे क्रिकेटचा सामना जनतेच्या शरीर सौष्ठवा ॥
करितां नाही ॥
खेळांत शेटजीं राज्य प्रचार आहे. राजशाहीचे लोकशाहीला ॥
आव्हान आहे ॥ ७१ ॥

येथे वर्तमानपत्रीय धंद्याचा श्रमिक संतांशीं ॥
संबंधच नाहीं ॥
भटजीच देशभक्त हरिभक्त देव, देवाचे भक्ताचे ॥
मुळींच नांव नाहीं ॥ ७२ ॥

मुंबईत पिशाच्च, भूतबाधा दिसते. दोऱ्यात ओवील्या ॥
मिरच्या लिंबू लोबत आहे ॥
जग चालले चंद्रावरी सारी सत्ता भटजींचे करी ॥
श्रमिक श्रद्धा आंधळी आहे ॥ ७३ ॥

मुंबईत मराठी साहित्य प्रसवते हत्तीचे अवाढव्य देहाने ॥
प्रगति ठरते भटजी घरांत ॥
जनतेसाठी भुरळ, थाप, करमणूक वर्तमानपत्रांत नीघते ॥
शेटजी रावण वरात ॥ ७४ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी श्रमिक नजरेने ॥
जवळलांब, भरपेट, उपाशीपोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ ॥

साहित्त्यांत दिसतो प्रचार शेटजी भटजी एकजूट ॥
कुविचार ॥
श्रमिकांनो आम्ही जगतो तुमचे कष्टावर तुम्ही ॥
जगा आमुचे ग्रंथावर ॥ ७५ ॥

आम्ही मुंबईचे राजस साहित्यीक तुम्हांला दाखवूं ॥
त्याच मार्गाने चला ॥
कष्ट त्याग तुमचा ! सल्ला आमुचा ! महाराष्ट्र राज्यकी ॥
जय बोला ॥ ७६ ॥

" गरिबी हटाव " संपत्तीवरच प्रीति क्रियेवींण वाचाळता ॥
साहित्य रिती ॥
बोलाचाच भात ! पोकळ आशीर्वाद वरती राज्य कारभार ॥
शेटजी भटजी हाती ॥ ७७ ॥

आम्ही पाहिली मुंबई, मुंबापुरी, मायानगरी, श्रमिक नजरेने ॥
जवळलांब भरपेट, उपाशी पोट, बस लोकल अनवाणी पायाने ॥धृ॥

गोविंदा आलारे आला ऽऽ टाळ मृदुंग गजराने ॥
नाचतो मुंबईवाला ॥
प्रेमभक्तीचा संगम तालीमींचा मेळा दहिहंडी ज्याने ॥
फोडिली त्याचाच बोलबाला ॥ ७८ ॥

येथें नटतो नटराज गजानन सौंदर्याने भाविकांच्या ॥
प्रेमभाव भक्तीने ॥
चालते स्पर्धा, मिरवणूक शिस्तीने फिटते पारणे ॥
पोलीस बंदोबस्ताने ॥ ७९ ॥

मुंबईत देव चालतो दयेचे पायाने निसर्ग धांवतो ॥
लहरीपाठीं वाऱ्याच्या झुळकेने ॥
शेटजीं नाचतो भटजीचे तालासुराने श्रमिक चालतो ॥
संतांचें मार्गाने ॥ ८० ॥

जीवा शीवाची गांठभेट देह आत्म्याचा थाटमाट ॥
रामसीतेची वहिवाट ॥
धर्म निधर्माची भरभराट दूध लोणी दहिवड्याचीं चॅट ॥
बनते पंढरीची वाट ॥ ८१ ॥

मुंबईत जीव आहे जीवनांत मौज, करमणूक, आनंद ॥
भरलेला आहे ॥
भारतमातेचे सौंदर्य सुंदर आहे. मुंबईमातेचे
नाक आहे ॥ ८२ ॥

संत भोजराज वदतात बदलवा मुंबई कष्टाची खा ॥
भाजी भाकरी ॥
मुंबईची करा पंढरपुरी, गोपाळपुरी, संतांची ॥
आनंदनगरी ॥ ८३ ॥



## २ आम्ही जातीचे ब्राह्मण

आम्ही जातीचे ब्राम्हण आमुचें सोयरे ॥
मुसलमान ॥
आमुचे जवळ नाही धान्य धन परी भारती ॥
भलताच मान ॥ १ ॥

आम्ही जातींचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
हिंदूलीग, मुस्लीमलीग विषारी झाडांना फुटली ॥
फुले, फळे, पान ॥ २ ॥

आम्ही जातीचे ब्राम्हण आमुचें सोयरे ॥
मुसलमान ॥
मंदिर मशीदीत दाखवितांना देव अल्ला ॥
धरीतो दोन्ही कान ॥ ३ ॥

आम्ही आतीचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
जेथे जाऊ तेथे जातीचा बडेजाव सर्व ॥
जातीत वरतान ॥ ४ ॥

आम्ही जातीचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
धर्म, राजकारणाचा ठेका श्रमिक, गरिबांचे ॥
टोंचतो कान ॥ ५ ॥

आम्ही जातीचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
अहि नकुलाची जुंपता जंमत बघा दोघांची गंमत ॥
टाचा उंचावून ॥ ६ ॥

आम्ही जातींचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
भारतात धर्मपंथ, राजपक्ष भेद पोटा साठीच ॥
केले निर्माण ॥ ७ ॥

आंम्ही जातीचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥ .
मुसलमान ॥
राजा जातीने मुसलमान प्रधान ब्राम्हण चाळा ॥
इतिहासाची पान ॥ ८ ॥

आम्ही जातीचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
गंधर्व, गायन कलेत मान पैंसा, पेशाने ॥
ठरतो महान् ॥ ९ ॥

आम्ही जातीचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
मिया मुठभर दाढी हातभर ! मिल गया बम्हन ॥
बात गयी लंबन ॥ १० ॥

आम्ही जातीचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
भारती जातीयवाद्यांची युती स्वार्थाचीच नीती ॥
युक्ति छान ॥ ११ ॥

आम्ही जातीचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
आम्हाला कष्टाचींच भीती नको धर्म न्याय नीति ॥
निर्मीतो स्वतंत्र स्थान ॥ १२ ॥

आम्ही जातीचे ब्राम्हण आमुचे सोयरे ॥
मुसलमान ॥
भारतात श्रमिक, सामान्य, गरिब, साधू, संत आहेत ॥
नसतेंच भान ॥ १३ ॥

संत भोजराज वदति भारतात सारेच करूं काम ॥
गाऊ यशाचे गान ॥
राखू देव, धर्माशी ईमान धरूं स्वाभिमान ॥
देशाभिमान ॥ १४ ॥



## ३ आम्ही कविता करितो

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
भटजीचें कारलें मिठांत घोळतो,तेलात तळतो,खाऊन पचवितो॥१॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
गरिबांचे भविष्य सांगतो श्रीमंतांचे भुत बाटलींत भरतो ॥ २ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
मातृदेवता, पिंतृदेवता, कुलदेवता, भारतमातेला नमन करितो ॥३॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
भारत निधर्मीचा नव्हे! धर्मियांचाच ठासून सांगतो ॥ ४ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
भारत शेटजी भटजींचें कबज्यांत जग जाहीर करितो ॥ ५ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
जातियवाद्यांचे लोखंडाला परिसच लावितो ॥ ६ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
पुढारी, पेंढारी गरिबा करितां नाहींत सत्यच बोलतो ॥ ७ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
आधुनिक मंबाजी, तुंबाजींचा प्रचार हाणून पाडतो ॥८॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
पंत, जंत कवींचे थोबाडांत कवितेनेच देतो ॥ ९ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
उच्चवर्णिय, उच्चभ्रू राजवटीचा धि:कार करितो ॥ १० ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
कवितेतून भाजी भाकरी रसिकांना पोटभर देतो ॥ ११ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
श्रीमंत, पतांचें ऐतखाऊ लेकांचे तोंड ठेचितो ॥ १२ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
कौरव, पांडव युद्धांत धर्मराजाचीच बाजू घेतो ॥ १३ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
निधर्मी, अधर्मींचा नाश देवकार्यं समजतो ॥ १४ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
श्रमिकांना जागृत करणें कवितेचा सार ठरतो ॥ १५ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
संसार करितो नेटका नसतो फाटका परमार्थ चटका असतो ॥१६॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
दुखियांचे दु:ख दूर, दु:ख देणारांचा गळा घोटतो ॥ १७ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
कष्टकऱ्यांना न्याय देतो, व्यापाऱ्यांना शिक्षा करितो ॥ १८ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
रसिका करितां गाणीं अरसिका करितां गोणीं देतो ॥ १९ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
छंद, नाद, साहित्त्य प्रचार पोटोबाच विठोबा बनतो ॥ २० ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
श्रीमंती करितां पैसा छे:! छे:! पंतांची धींड काढितो ॥ २१ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
रावणाचे नांव दसऱ्याला व होळीलाच घेतो ॥ २२ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
भारती जे हीन, दीन, पतीत त्यांनाच उठवितो ॥ २३ ॥

आम्ही कविता करितो म्हणजे काय हो ऽ करितो ॥
झोप येत नाही म्हणून नव्हे ! झोपाळूंनाच जागवितो ॥ २४ ॥

संत भोजराज तुका, नामा, बापुजी, साने परंपरा चालविती ॥
संतांचे दास म्हणूनच जगती संतमित्र म्हणुन मिरविती ॥ २५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
20048



# ४ नभोवाणीला वाणी लाभले

घन बरसत बरसत भूवरी आले ॥
सप्तमहाली थंड वारे झोपडींत पाणी शिरले ॥ १ ॥

घन बरसत बरसत भूवरी आले ॥
फोर्ड, वाळकेश्वर न्हाले कुर्ला परळ पुरांत बुडाले ॥ २ ॥

घन बरसत बरसत भूवरी आले ॥
हरिपांचे कारंजे उडाले गरिबांचे तोंडचे पाणी पळाले ॥ ३ ॥

घन बरसत बरसत भुवरी आले ॥
कामातुरांना काम मिळाले, मजूर निकाम जहाले ॥ ४ ॥

घन बरसत बरसत भूवरी आले ॥
धुंद गगनी धनू फुलले व्याकूळ नयनी अश्रू गळले ॥ ५ ॥

घन बरसत बरसत भूवरी आले ॥
लयला गाली गुलाब फुलले मजनूचे होश उडाले ॥ ६ ॥

घन बरसत बरसत भूवरीं आले ॥
राघूला कंठ फुटले कोंबडे ढसढसा रडले ॥ ७ ॥

घन बरसत बरसत भूवरी आले ॥
नभोवाणीला वाणी लाभले संत वाणीला पाणी लागले ॥ ८ ॥

संत भोजराज भारतांत आधुनिक संतकवि ठरले ॥
भटजीचे टाकावू कवितेला टिकावू उत्तर दिले ॥ ९ ॥

## ५ शिष्ट भारताची प्रगति खुंटवणार

जग चालले पुढे रॅकेटने चंद्र, मंगळावरी ॥
ज्ञान विज्ञानाचा संगम नवलच होऽ खरोखरी ॥ १ ॥

आम्ही भारतीय आमुचीपण ऐका बहादुरी ॥
दुसऱ्याची चूक काढणे कर्तव्य, कर्म ठरी ॥ २ ॥

महादेवाचे डोक्यावरील चंद्रावर गोऱ्याने पाय ठेविला ॥
भारतांत होणार भूकंप, दुर्भिक्ष भटजींना शोध लागला ॥ ३ ॥

शेटजी, भटजी म्हणवितात देशभक्त रहाती विषयासक्त ॥
सत्ता, संपत्तीच साक्ष मोक्ष जाणती व्यभिचार फक्त ॥ ४ ॥

पंत, जंतांची कृती वटवाघुळाची वरती पाय डोके खालतीं ॥
लिखाणाचेच उत्पादन, विज्ञान अज्ञान पेरिती भारती ॥ ५ ॥

भटजींची पोरं भट्टीचे विस्तवावरच पुराण वांगी भाजती ॥
वाचती कोकशास्त्र, कामशास्त्र झोपेतच बडबड करिती ॥ ६ ॥

संत भोजराज वदति शिष्ट भारताची प्रगति खुंटविणार ॥
कष्टावर नच श्रद्धा रम, रमा, रमीमध्येंच रमणार ॥ ७ ॥

## ६ तुकारामला वदति सखाराम

उन्हाने फुटती लाह्या जलधारांनी भिजते अंग ॥
हातवारे करी ॥
तुकारामला वदति सखाराम जो मुंबापुरीचा ॥
वारकरी ॥ १ ॥

रात्रीला जो बनवितों नोंवरी रक्षक म्हणून जीवित ॥
मालाचे रक्षण करीं ॥
तुकारामला वदति सखाराम जरी तों रहातों ॥
परोंपकारी ॥ २ ॥

नच देहाला कांती मनाला शांती शांततेसाठीच ॥
रक्ताचे पाणी करी ॥
तुकारामला वदति सखाराम जों सदा कष्टाची ॥
खातो भाजी भाकरी ॥ ३ ॥

चंगी भंगी प्रत्येकजण जीवाची मुंबई करी पुढारी ॥
पोंलीसांचें नांव उघडे करी ॥
तुकारामला वदति सखाराम जरी तो संयमी ॥
आचार विचारी ॥ ४ ॥

सत्ता संपत्ती ज्यांचा धंदा रात्रंदिवस करिती ॥
गुंडगिरी ॥
तुकारामला वदति सखाराम खापरहंडी ॥
फोडती डोक्यावरी ॥ ५ ॥

जन निंदोत वानोत जो मुंबईत आपुले ॥
कर्तव्यकर्म करी ॥
तुकारामला वदति सखाराम जो कायम मुंबईचा ॥
मानकरी ॥ ६ ॥

गुंड, चोर, दरवडेखोर, समाजकंटक सदा सर्व ॥
पोलिसांचे वैरी ॥
तुकारामला वदति सखाराम लोकशाही रीत ॥
नाही बरोबरी ॥ ७ ॥

संत भोजराज सदैव पोलिसांना उपदेश करी ॥
भजा पांडुरंग हरी ॥
करा कष्ट ! रहा एकनिष्ठ बना ! पंढरीचे ॥
वारकरी ॥ ८ ॥



# ७ आमुचे बापजादे

आमुचे बाप जादे शिक्षित नव्हते शंकाच ॥
नाही ॥
अंगुठ्याची त्यांची शाई कधी वाळलीच ॥
नाही ॥ १ ॥

हौस, मौज, चैन भोग त्यांनीं जीवाची मुंबई ॥
केली नाही ॥
परि देशभक्त, हरीभक्त म्हणून त्यांचा बोलबाला ॥
झाला नाही ॥ २ ॥

मांसहारापेक्षां, शाकाहार बरा अंथरुणाबाहेर पाय ॥
गेले नाही ॥
धर्मासाठी प्राण वेचला तरी शंकराचार्यांनी ॥
जवळ केले नाही ॥ ३ ॥

चरित्र चारित्र्य घडविण्यांत समर्थ, भटजी धर्म ॥
ठाऊक नाही ॥
गुणातीत पुरुषोत्तम ठरले तरी त्यांचा इतिहास ॥
रंगला नाही ॥ ४ ॥

" लाल बावटेकी जय हो " रामाशिवाय तोंडांत ॥
नांव नाही ॥
श्रमिक म्हणून जगले तरी साम्यवाद्यांनी जेवण ॥
वाढले नाही ॥ ५ ॥

उपाशी पोट बेकारी जरी गरिबीतही धीर ॥
सोडला नाही ॥
राजकारण खेळले परंतू, कमरेचे डोक्याला ॥
गुंडाळले नाहीं ॥ ६ ॥

स्वाभिमानी जीवन जगले विभूती पूजा केली ॥
नाही ॥
अंबारी उलटी झाली तरी शेटजींचे दारी झोळी ॥
पसरली नाही ॥ ७ ॥

अंधश्रद्धा, अंधशक्तीनं दगडाचे देवाशी डोकं ॥
लाविलं नाहीं ॥
सत्य, न्याय धर्मानं वागतांना दुःखाची पर्वा ॥
केली नाही ॥ ८ ॥

आमुचे बापजाद्यांना स्वार्थ, परमार्थ फरक ॥
कळला नाही ॥
तरीच पिढ्याच्या पिढ्या त्यांची गरिबी त्यांना सोडून ॥
गेली नाही ॥ ९ ॥

बोले तैसे चाले ! त्याची वंदावी पाऊले धन संचय ॥
केले नाही ॥
कष्ट करितांनाच भेटला विठोबा ब्राम्हणांनीं ॥
नमस्कार केला नाही ॥ १० ॥

सिंडीकेट, इंडिकेट, शेका, संसोपा सुंदोपसुंदी ॥
कळली नाही ॥

संसार आदर्श करितांना ब्राम्हण, भटजीकडे ॥
बुद्धी गहाण ठेवली नाही ॥ ११ ॥

सत्त्य, अहिंसा, प्रेम, भक्तीचाच केला सौदा ! काळा ॥
बाजार ठाऊक नाहीं ॥
जें काय कमविले ते साधुसंतांसाठी देतांना ॥
मागे पुढे पाहिले नाही ॥ १२ ॥

संत भोजराज वदति आमुचे बापजादे भारतभूचे ॥
मानकरी ॥
कष्टावरच श्रद्धा अज्ञानावर अश्रद्धा देवाचेच ॥
पाय धरा धरी ॥ १३ ॥

## ८ श्रीरंगा, पांडुरंगा

श्रीरंगा पांडुरंगा ॥
माझी काया, तुझी छाया ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी माया, तू विठूराया ॥ १ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
माझा अभाव, तुझाच भाव ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी रंक, तू राव ॥ २ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी पाषाण, तू खाण ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
तू चंदन, मी सहाण ॥ ३ ॥

श्रीरंग, पांडुरंग ॥
माझे अंग, तुझा संग ॥
श्रीरंग, पांडुरंग ॥
तू ज्योति, मी पतंग ॥ ४ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी जीवन, तू सार ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी निराधार, तू आधार ॥ ५ ॥

श्रीरंग, पांडुरंग ॥
माझा चंग, तुझा संग ॥
श्रीरंग, पांडुरंग ॥
मी भंग, तू अभंग ॥ ६ ॥

श्रीरंग, पांडुरंग ॥
मी अबोल, तूच बोल ॥
श्रीरंग, पांडुरंग ॥
मी सखल, तू खोल ॥ ७ ॥

श्रीरंग, पांडुरंग ॥
मी घेव, तू देव ॥
श्रीरंग, पांडुरंग ॥
मी पेव, तू एकमेव ॥ ८ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी डोळा, तू दृष्टी ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी सृष्टी, तुझी वृष्टी ॥ ९ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
माझी दुष्कीर्ती, तुझी कीर्ति ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
माझी मूर्ति, तुझी स्फूर्ति ॥ १० ॥

श्रीरंग, पांडुरंग ॥
मला खेद, तुला न खंत ॥

श्रीरंग, पांडुरंग ॥
मला अंत, तू अनंत ॥ ११ ॥

श्रीरंग, पांडुरंग ॥
मी ओवी, तू अभंग ॥
श्रीरंग, पांडुरंग ॥
मी टाळ, तू मृदुंग ॥ १२ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
माझी करणी, तुझी भरणी ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
माझा देह, तुझे चरणी ॥ १३ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
माझे नांव, तुझे गांव ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मला पाव, दुनिया दाव ॥ १४ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
तन चंगा, मन मंगा ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी यमुना तू गंगा ॥ १५ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी वानर, तू नर ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
मी उत्तम, तू पुरुषोत्तम ॥ १६ ॥

श्रीरंगा, पांडुरंगा ॥
तुला वरिता, नांव घेता ॥
श्रीरंगा, पांडुरंगा ॥
तुझे करितां, माझी कविता ॥ १७ ॥

श्रीरंग, पांडुरंग ॥
तू लाट, मी तरंग ॥
श्रीरंग, पांडुरंग ॥
तुझे भजनी, भोजराज दंग ॥ १८ ॥



# ९ करितात शृंगार साज

असेल माझा हरी ॥
तर देईल खाटल्यावरी ॥
हे नच संतांचे बोल ॥
असंतांची भाषा आहे फोल ॥ १ ॥

वाममार्गे जो धन वेचकरीं ॥
उठल्या बसल्या हरि धरी करीं ॥
असंत देवाची बदनामी करी ॥
हेच नवल रहाते खरोखरी ॥ २ ॥

संत भोजराज वदति ॥
पंतांना समजावे हिंस्त्र सावज ॥
नम्रतेपेक्षा गर्वाचाच ॥
करितात शृंगार साज ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २००४८ दि: काव्य
क्रमांक २१८ नोंद दि: २३१७९

# १० देव हृदयांत लपला आहे

पाथरवटाचें हाती सांपडला दगड दैव उजळले ॥
टाकीचे घाव सोसणे देवाला प्राप्त झाले ॥
दगडाचा बनला देव मन सत्ता, संपत्तीत गुंतले ॥
पुढाऱ्यांचें हाती जीवन मुग्ध बसणें नशिबी आले ॥ १ ॥

देवापेक्षां संत बनणें कठीण हो ऽ ऽ आहे ॥
हाता पायाला कष्टाचे चटके मग पोटाला भाकर आहे ॥
संतांचे घरचे जेवण देवाचा तीर्थ प्रसाद आहे ॥
संत हाची देव, संत हाचि देव परंपराच आहे ॥ २ ॥

संत भोजराज वदति मायेतला देव चैन भोगीत आहे ॥
राज्य राहील शेटजीचे भटजी राजपरंपरा चालवीत आहे ॥
श्रमिक संत रात्रंदिवस अन्नासाठी रक्त जाळीत आहे ॥
भारतांत भरलेला देव संतांचे हृदयांत लपला आहे ॥ ३ ॥

# ११ राजसांची लोकशाही

आमुच्या नाऱ्याला नाही चाड ॥
तरी पायी सदा सत्ता चाळ ॥
वहावितो सदा उलटी गंगा ॥
भारती घाली धांगड धिंगा ॥ १ ॥

पंत नाऱ्याला एकच काम ॥
भेद पाडणें हेंच रिकामे काम ॥
तामसांचा घेतो हात हातात ॥
संपत्तीचा हात राही पोटांत ॥ २ ॥

नाऱ्या नुऱ्या पिऱ्या एकत्र जेवतात ॥
जातियता चर्चा हीच भरमसाट ॥
एकमेकां देती दोष शिव्या जोरात ॥
श्रमिकांची करिती दिशाभूल फसवितात ॥ ३ ॥

शेतकरी कामकरी अर्धपोटी ॥
नाऱ्या दाखवितो चिंता मोठी ॥
राजकारण हाच रहातो तोडगा ॥
रात्रंदिवस नाऱ्याची फसवणूक बघा ॥ ४ ॥

नाऱ्याला ना आचार विचार ॥
सरकार विरुद्ध करितो प्रचार ॥
पक्षाचे लावूनी गरुड पंख ॥
टोचतो विष विंचवाचा डंख ॥ ५ ॥

स्वार्थ भेदा भेदाचीच मूर्ति ॥
भाषण लिखाणात रहाते स्फूर्ति ॥
रोम रोमी पिंड पोसला नाऱ्याचा ॥
महारोग श्रमिक राग द्वेषाचा ॥ ६ ॥

संभोगी नाऱ्याचा चालतो प्रचार ॥
इंग्रजी संस्कृतांतून मांडतो विचार ॥
शेटजी, पुढारी, पेंढारी, नौकरशाही ॥
जगा सांगतो हीच खरी लोकशाही ॥ ७ ॥

संत भोजराज श्रमिकांचे सांगाती ॥
नाऱ्याचा अभ्यास करा हेच वदति ॥
जातियवाद्यांची जोवर पकड भारती ॥
राजस तामस रोखणार प्रगति ॥ ८ ॥

# १२ शेटजीराज्य प्रचारक

उच्चभ्रू डॉक्टरेट, पद्मश्री, पद्मभूषण आहेत श्रमिक ॥
रामअरि ॥
भेदा भेद अशांतता मूळ, राजस प्रचारक ठरतात मोठे ॥
मानकरी ॥ १ ॥

हजारो वर्षे श्रीमंतांचेच राज्य राहो ! गोड तामसांचा ॥
सूर ॥
सत्ता संपत्तीधारियांची संघटणा प्रभावी श्रमापासून ॥
रहातात दूर ॥ २ ॥

अंधश्रद्धा, अंधभक्तीचे पिक पेरतात ढोंगीच ॥
क्रांतीवीर ॥
श्रमिक सामान्यांची केली दिशाभूल बनविले ॥
गुलाम वेडेपीर ॥ ३ ॥

भांग, गांजा, चरस अफिमचे औषध देतात ॥
साहित्त्यातून ॥
अडाणी, भोळया, सामान्य जनांचे लिखाण हिरावतात ॥
संघटणेतून ॥ ४ ॥

साहित्त्य, रेडिओ, वर्तमानपत्र, व्यासपीठ पुढाऱ्यांचेच ॥
पेव ॥
निधर्म, अधर्मातून सांगतात धर्म आव तुकाराम ॥
नामदेव ॥ ५ ॥

आम्ही धर्मी, मंत जाणतो कर्तव्य कर्म हाकू देशाचे ॥
तारू ॥
येवोत संकट आम्हांवर आम्ही धैर्य, शांततेने ॥
सारे निवारू ॥ ६ ॥

नको आम्हा भटजींचा आदेश नको भिकेचे ॥
डोहाळे ॥
रात्रंदिवस करूं काम भजू राम भोगू आनंद ॥
सोहळे ॥ ७ ॥

संत भोजराज वदति लिखाण भाषणाचा हक्क ॥
बजवा ॥
संतांनी तो तुम्हांला दिला आहे, जाणा भटजी ॥
शेटजी कावा ॥ ८ ॥



## १३ पांडुरंगच डोळा

नाम घेता उठा उठी ॥
जन्मा येते विरक्ति पोटी ॥ १ ॥

नाम घेता उठा उठी ॥
माया बनते पातळ खोटी ॥ २ ॥

नाम घेता उठा उठी ॥
मन होते मोठे बुद्धि मोठी ॥ ३ ॥

नाम घेता उठा उठी ॥
गंगेचे काठी पुण्यच साठीं ॥ ४ ॥

नाम घेता उठा उठी ॥
ऋद्धि सिद्धि दास आणि दासी ॥ ५ ॥

नाम घेता उठा उठी ॥
भक्ति प्रेमाचीं गट्टी राग होतो कष्टी ॥ ६ ॥

नाम घेता उठा उठी ॥
आनंदाचे पोटी अमृत स्रवते ओष्टी ॥ ७ ॥

नाम घेता उठा उठीं ॥
देवच सृष्टि पर्जन्य वृष्टी ॥ ८ ॥

नाम घेता उठा उठी ॥
कळी काळाची ताटातुटी ॥ ९ ॥

नाम घेता उठा उठी ॥
जीवा शीवाच्या वाटाघाटी ॥ १० ॥

नाम घेता उठा उठी ॥
साधु संतांच्या गांठी भेटी ॥ ११ ॥

नाम घेता उठा उठी ॥
पंढरी भरते यात्रा मोठीं ॥ १२ ॥

नाम घेता उठा उठी ॥
येती फळे रसाळ गोमटी ॥ १३ ॥

नाम घेता उठा उठी ॥
पांडुरंगच डोळा अभंग दृष्टि ॥ १४ ॥

नाम घेता उठा उठी ॥
संत भोजराज बनले श्रेष्ठी ॥ १५ ॥

# १४ नारायणराव

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
खाली डोके वरती पाय ॥ १ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
घरचा गरीब भलतांच आव ॥ २ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
जातिवरच मिळतो दिल्लीचा भाव ॥ ३ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
भाषा गोड प्रेमाचा अभाव ॥ ४ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
दिवसा काव रात्री म्याँव ॥ ५ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
शेटजीची संगत लाडूची पंगत ॥ ६ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
चौदा भाषिक राज्यांत सोन्याचा भाव ॥ ७ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
वर्तमानपत्रांत करितो शिरकाव ॥ ८ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
सरड्याची धाव ! स्वर्गांत पाय ॥ ९ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
कामाचा चोर वदतो शाव ॥ १० ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
आगीचे गांव शांतता नांव ॥ ११ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
दगडावर भाव देवा मला पाव ॥ १२ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
अहिंसेचा सागर हिंसा हीच नाव ॥ १३ ॥

नाऱ्या नाऱ्या नारायणराव ॥
भाषण लिखाण हाच व्यवसाय ॥ १४ ॥

संत भोजराज वदतात सोडा नाद नाऱ्याचा ॥
करा कष्ट, पिकवा धान्य, लावा ध्यास भारताचा ॥ १५ ॥

# १५ कावळे-बगळे

तालावर ताल तीन ताल ॥
वरती बसले जगत्पाल ॥ १ ॥

मी ज्ञानी ! मी ज्ञानी ! काव ऽ काव ऽ ॥
पूर्वांपारची वाईट सराव ॥ २ ॥

कुणी खाकरायचीच बोली ॥
कान्होजीराव आले वरून खाली ॥ ३ ॥

एक डोळा तिरपी चोच घाण मटकावली ॥
जगा सांगतो ! हीच प्रभूची सावली ॥ ४ ॥

नगरपालिकेची जागा दुर्गंधी सुटली ॥
गावाबाहेरच बगळ्यांची मैफल रंगली ॥ ५ ॥

वळवळतांच किडे बगळा अंतरी चरफडे ॥
भरतांच पोट पाण्यासाठी तडफडे ॥ ६ ॥

नदी किनारी बगळा बैसला ॥
समजावे कां ! प्रभु चिंतनी रमला ॥ ७ ॥

एका पायावर ध्यानस्थ, मनी मच्छीची आशा ॥
देहाचा भोग भोगला, शेवटी पदरी निराशा ॥ ८ ॥

संत भोजराज वदतात नका बनू कावळे बगळे ॥
व्हा सारे हरिभक्त, देशभक्त, राजहंस सगळे ॥ ९ ॥

## १६ याहो ऽ घ्याहो ऽ

याहो ऽ घ्याहो ऽ घ्याहो ऽ कुणी माझी ॥
पुस्तके ताजी घ्याहो ऽ ऽ ऽ ॥ धृ ॥

घरात तुमची राणी ॥
बसली केवील वाणी ॥
बहीण रागे भरली ॥
लेक लाडकी फुगली ॥
जावई लाडका अडला ॥
मुलगा थोरला रुसला ॥
जा ! जा ! त्यांना जा हसवा ॥
काढा त्यांचा ना ! रुसवा ॥ १ ॥

याहो ऽ घ्याहो ऽ घ्याहो ऽ कुणी माझी ॥
पुस्तके ताजी घ्याहो ऽ ॥ धृ ॥

कथा, कविता, कादबरी ॥
प्रकाश पसरे अंबरी ॥
निबंध टीका नाटक ॥
ज्ञानाचे खुलते फाटक ॥
घ्या ऽ घ्या ऽ लौकर घ्याना ऽ ॥
नच किमत बघू अनमोल चना ॥ २ ॥

याहो ऽ घ्याहो ऽ घ्याहो ऽ कुणी माझी ॥
पुस्तके ताजी घ्याहो ऽ ऽ ॥ धृ ॥

रक्ताचे करुनी पाणी ॥
केली पेरणी व निंदणी ॥
सहित्य आले हंगामांत
प्रजा सत्ताक भारतात
श्रमिक राज्य महाराष्ट्रांत ॥
सहकारी शेत शिवारांत ॥
नयन मनोहर, मनोरंजक ॥
ज्ञान बोधमय षड्रिपू भंजक ॥ ३ ॥

याहो ऽ घ्याहो ऽ घ्याहो ऽ कुणी माझी ॥
पुस्तके ताजी घ्याहो ऽ ॥ धृ ॥

संत भोजराजांची पुस्तके ॥
कष्टाची भाजीं भाकरी आहे ॥
मराठी भाषिक महाराष्ट्र ॥
भारत श्रमिकांचा वर्णिला आहे ॥
भेदा भेद नष्ट समता भूषण ॥
धर्म राजकारण गोड गुँफण ॥
प्रेम भक्तीचा संगम आहे ॥
कृष्ण गोप गोपींचा मेळा ॥
जींवन कलेचा गोफ गुंफला ॥
श्रमिक राज्य ध्येय धारणा आहे ॥ ४ ॥

याहो ऽ घ्याहो ऽ घ्याहो कुणी माझी ॥
पुस्तके ताजी घ्या हो ऽ ऽ ॥ धृ ॥

## १७ देह गेला पैल तीरा

देवा ! जाळतांच राग लोभ मायेचा पसारा ॥
भजनांत दंग गुंग देह गेला पैल तीरा ॥ १

जेथे जावे तेथे श्रीरंगा प्रपंच थाटला ॥
प्रेम भक्तिचे संगमांत, संग संतांचा घडला ॥ २ ॥

देह आत्म्याची लढाईमध्यें रथ उभा केला ॥
उद्धरला स्वयम् आत्मा ! परमात्मा सखा झाला ॥ ३ ॥

स्त्रिया पोरांचा आक्रोश टाळ मृदुंगी लोपला ॥
भरला वेडयांचा बाजार वदति आजाराने मेला ॥ ४ ॥

संत भोजराजाची शुद्धि, बुद्धि, हरपली ॥
माया पळतांच लांब विठाई जवळी आली ॥ ५ ॥

# १८ भारत हा धर्मियांचाच राही

निर्धर्मि राज्यात देवाला स्थान नाही ॥
कारण तो मंत्र्यांचें भाषणांत भरडला जाई ॥ १ ॥

अधर्मि राज्यांत देव नाहींच नाही ॥
कारण सारे देवांचा भार पुढारीच वाही ॥ २ ॥

शेटजी राज्यांत सत्ता संपत्ती हाच देव पाही ॥
काळ्या बाजारांत तो जणू शोभतो विठ्ठल रुकमाई ॥ ३ ॥

भटजी राज्यांत देव पोथी पुराणांत लोपला जाई ॥
कारण मतदानापुरतांच देवावरील भाव राही ॥ ४ ॥

भारतांत विभूति पूजा हेच होम हवन हनन चालू राही ॥
आत्मा हा श्रमिकांचे रक्ताने माखला जाई ॥ ५ ॥

राम रावण प्रसिद्धी वर्तमानपत्रांचे सार राही ॥
कुंभकर्णी रामायणांतील रामरावण युद्ध संपतच नाही ॥ ६ ॥

कष्टाचे खाणें पिणें ह्याचे भारती कोड कौतूक नाही ॥
हरामाचे खाणें, हरामखोर हाच कौतुकाचा भाग राही ॥ ७ ॥

भारती शेतकऱ्यांची काळजी जमीनदार घेई ॥
मजुरांचे मजुरीचे काळजीने शेटजी लंपट होई ॥ ८ ॥

पेंढाऱ्याकडे बघून पुढाऱ्यांचे शीर नम्र होई ॥
लांडगा, वाघ, सिंह, बैलांतून निवडला जाई ॥ ९ ॥

जेथे जाल तेथे भारती नवी नवलाई जन्मा येई ॥
सारे कष्ट करणारे गुलाम राजशाही हीच लोकशाही राही ॥१०॥

अश्वासन भूलथाप बोलाचाच भात देशभक्ति म्हटली जाई ॥
ज्याचे हातात ससा तो पारधी कुणाचा पायपोस
कुणाचे पायात नाही ॥ ११ ॥

शाकाहार, मांसाहार हा वाद सनातन्यांचा राही ॥
श्रमिक उपाशी कां ! हा प्रश्न युक्तिने डावलला जाई ॥ १२ ॥

संत भोजराज वदतात भारत हा धर्मियांचाच राही ॥
कष्ट हाच मंत्र, उत्पादन धर्म, देव श्रमिक संतातच पाही ॥१३॥



## १९ श्रमिकांचाच भार वाही

आमुचा कुणाशी द्वेश नाही ॥
राग कुणावर नाहीच नाही ॥
आम्हा हेवा दावा ठावा नाही ॥
सदा सर्वदा देवावरच भाव राही ॥ १ ॥

कष्टावर आमुची श्रद्धा आहे ॥
उत्पादन हेच ध्येय आहे ॥
वाटप पद्धति धारणा आहे ॥
सहकार हे धोरण आहे ॥ २ ॥

आम्ही खेद खंत पाळीत नाही ॥
सत्ता संपत्तीचा लोभ नाही ॥
अहिंसेवरच आमुची श्रद्धा राही ॥
निर्व्यसन, संयमी देव पाठी राही ॥ ३ ॥

उणे दुणे बोलणे ठाऊक नाही ॥
बोलण्यात सदा साखर राही ॥
स्तुती निंदा आम्ही जाणत नाही ॥
खाल्या घरचे वासे मोजीत नाही ॥ ४ ॥

कुणाची निंदा कुचेष्टा करीत नाही ॥
थट्टा मस्करी आमुचे गांवीच नाही ॥
प्रेम भक्तीचाच सदा सौदा पाही ॥
समाधानी जीवनाचे सार राही ॥ ५ ॥

एकदां जन्मलो पुन्हा मरणार नाही ॥
मरणांती शिल्लक कीर्तिरूपेच राही ॥
गूणांचे आगर प्रेमभक्ति सागर पाही ॥
संत भोजराज श्रमिकांचाच भार वाही ॥ ६ ॥

## २० ईश्वर हीच साक्ष एकमेव

भजरे मना प्रभू रामकृष्ण हरी
गाता भजता संसार ताप हारी ॥ १ ॥

अमृतमय देवाचे असे नाम गोड ॥
पुरविते जिवींचे सारे कौतुक कोड ॥ २ ॥

लागला छंद जया हरि भजनाचा ॥
गोड तयाची वाचा, बनतो संतांचा साचा ॥ ३ ॥

संत संगतीने संसार नय्या होते पार ॥
कळतो महिमा रुक्मादेवीवरुचा अपार ॥ ४ ॥

संत भोजराजाला कर्तव्यकर्मात भेटला देव ॥
सर्वाभूति ईश्वर साक्षीदार लाभतो एकमेव ॥ ५ ॥

# २१ ज्ञानाची पायरी

आम्ही संसार छान केला पण रमलो नव्हतो ॥
संसारात रमलो तरी कधीच गुरफडलो नव्हतो ॥ १ ॥

आम्ही कर्तव्य केले कर्मयोगी, ज्ञानयोगी बनलो ॥
स्वार्थी, ढोंगी यांचे मते कुचकामी, नालायक ठरलो ॥ २ ॥

आम्ही सत्त्य बोललो, ध्येयानेच पुढे चाललो ॥
शिष्ट लोकांचे मते चुकलो ! वाया गेलो ॥ ३ ॥

आम्ही लायक, नालायक ह्यामध्ये कधींच नव्हतो ॥
जे काय केले नच केले देवाला अर्पित होतो ॥ ४ ॥

संत भोजराज एक आदर्श संसारी आहे ॥
संतांचे दारांसमोरील ज्ञानाची पायरी आहे ॥ ५ ॥



## २२ वाढवा श्रमिक पंथ

जनता हाच जनार्दन आम्हीच तुम्हा शिकविले ॥
दगडांत रहातो देव पुजाऱ्यांनी छान बनविले ॥ १ ॥

पक्ष, पंथ, भेदाभेद पाडणे हेंच पेंढाऱ्यांचे काम ॥
सारा भारत उच्चभ्रूंचाच मारितात बरतान ॥ २ ॥

चैन, भोग, सुधारणेचे नांव घेत करितात बुवाबाजी ॥
शेटजी, भटजींची एकी चालतो प्रचार चालते चैनबाजी ॥ ३ ॥

आज़चा राजकारणी उद्याचा धोरणी एकाच माळेचे मणी ॥
जुंपा लेकांना कामाला तेव्हांच श्रमिक राहील अग्रणी ॥ ४ ॥

संत भोजराज वदतात करा कष्ट ! काढा उत्पादन ! बना संत ॥
एकमेकां साह्य करोनी भारती वाढवा श्रमिक पंथ ॥ ५ ॥

# २३ आज स्वातंत्र्यदिन

आज स्वातंत्र्यदिन, गर्जा स्वातंत्र्याचा जयजयकार ॥
कशास म्हणावे स्वातंत्र्य ! जनहो करा मनाशी विचार ॥ १ ॥

कोण नागवितो, फसवितो खूप अभ्यास करणार ॥
स्वातंत्र्याचा पुरेपूर उपभोग कष्टानंतर फळ चाखणार ॥ २ ॥

कष्टाशी ज्यांचे वांकडे, ममतेचे ज्यांना सांकडे, खूप शिकविले ॥
त्यांनीच आम्हा बनविले पारतंत्र्यात खिचपडत ठेविले ॥ ३ ॥

आम्हाला आली अनुभूति, कळले भारत, पन्नास कोटींचा ॥
जे राबतील प्रथम त्यांचा मग राहील साधू संतांचा ॥ ४ ॥

संत भोजराज वदतात आमुचा पंथ प्रेम भक्तिचा रहाणार ॥
जो पाहिल भारताकडे वक्र नक्र समजून त्यास ठार करणार ॥५॥

# २४ आम्ही कोण ?

आम्ही कोण ? काय विचारतां राव ! उगीच खाता भाव ॥
तुम्हालाच देतो फुली बद करा डरांव ऽ डराँव ऽ ॥ १ ॥

आम्हीं कोण ? काय विचारता राव ! उगीच खाता भाव ॥
भारत आमुचे नांव महाराष्ट्र आमुचे गांव ॥ २ ॥

आम्ही कोण ? काय विचारता राव उगीच खाता भाव ॥
शिवाजी आमुचा राणा जगी गर्जते नांव ॥ ३ ॥

आम्ही कोण ? काय विचारता राव उगीच खाता भाव ॥
बापूजी आमुचे राम श्रमाचेच काम तरीच तरते नाव ॥ ४ ॥

आम्ही कोण ? काय विचारता राव उगीच खाता भाव ॥
तुकारामची गुरु, बाप रुक्मादेबीवर कायम राही भाव ॥ ५ ॥

आम्ही कोण ? काय विचारता राव उगीच खाता भाव ॥
श्रमिकांचीं भलाई, विषमतेशी लढाई ठरतो झुंझारराव ॥ ६ ॥

आम्ही कोण ? काय विचारता राव उगीच खाता भाव ॥
जनतेचे संत गरिबांचे पंत मताने ठेंचू रावांचे राव ॥ ७ ॥

संत भोजराज वदति सर्वच पुढाऱ्यांना समजावं मानभाव ॥
देशभक्ती हरिभक्तीचा पूर्ण अभाव सत्तेवरच रहातो प्रभाव ॥८॥

## २५ गोकूळ अष्टमी

संपली काळ रात्र, संपले अज्ञान जन्मला गीतास्वामी ।।
आज आहे संत जनहो ज्ञानमयी गोकुळअष्टमी ।। १ ।।

लहानाहून लहान, थोराहून थोर योगेश्वर भगवान ।।
रात्रंदिन करू हरिभजन गाऊ श्रीकृष्णाचेंच गान ।। २ ।।

भेदाभेद संपला गोकुळी साधू संत झाले गोळा ।।
मुरलीधर वाजवितो मुरली सभोवती गोपींचा मेळा ।। ३ ।।

राग, द्वेष, मोह, माया सर्वेची दूर दूर सारूंया ।।
हरिभजनी होऊनी गुंग नाचतांना गोविंद गीत गाऊया ।। ४ ।।

संत भोंजराजाचे भगवान श्रीकृष्ण आहे कुलदैवत ।।
तुटली माया, तुटले पाश रात्रंदिन वासुदेव चिंतनी रत ।। ५ ।।



# २६ पेटली ज्योत मम अंतरी

चला चला हरी मंदिरी ॥
पेटली ज्योत मम अंतरी ॥ १ ॥

प्रेम भक्तिचा प्रसाद सेवूया ॥
भजनी तन मन अर्पण करूया ॥ २ ॥

सोहम् मंत्र गाऊनी हरि पुजूया ॥
गुरुपद पाऊले कपाळी धारण करूया ॥ ३ ॥

प्रकाशले ब्रम्ह उजळली काया ॥
सुटला मोहपाश तुटली माया ॥ ४ ॥

संत भोजराज हरिं भजनी गुंग ॥
रात्रंदिन घडतो संत संग ॥ ५ ॥

## २७ लोकशाही ब्रह्म

आम्ही बघितली विद्यामंदिरे, माध्यमिक स्कूल, महाविद्यालये ॥
झाले मन अप्रसन्न ॥
ज्ञान आमुचा विषय नव्हे ! विषय हाच रहातो विषय ॥
ध्येय बघुनी झालो सुन्न ॥ १ ॥

पदवी, गर्व, ताठा, बढती, राष्ट्रपदक ढाल भूषण ॥
रोज खातांत तामस अन्न ॥
चालवितात गुरू परंपरा, राजपरंपरा मोठ्या शेखीने ॥
वदति हेच लोकशाही ब्रम्ह ॥ २ ॥

संत भोजराज वदतात शिक्षणांत अमुलाग्र बदल ॥
घडविणे ध्येय आमुचे ॥
संतच तो घडविणार कारण तिथेच राहील ॥
अधिष्ठान प्रभूचे ॥ ३ ॥

# २८ तेथेंच दिसेल ज्ञान प्रकाश

खावे प्यावे मजा करावे हेच आमुचे कर्तव्य काम ॥
भारतीय जे निर्व्यसनी, संयमी, त्यावर मारणार वरतान ॥ १ ॥

सत्तेचे शहाणपण, बढतीं आम्हां सरकारचेच अनुदान ॥
श्रमिकांना मारक, संतांना गारद समजणार हेच ज्ञान ॥ २ ॥

कोण आमुचे करील वांकडे, त्यावर येणार संकट सांकडे ॥
आमुची भारतीय अभक्तांची एकी भक्तांचे करूं तुकडे तुकडे ॥ ३ ॥

महाराष्ट्र भारत पुढाऱ्यांचा रोज प्राचार्य लिहिणार इतिहास ॥
निधर्मी राज्याचा प्रचार हाच राहील आत्मविश्वास ॥ ४ ॥

संत भोजराज वदतात व्हा जागृत एकीने करा एक पाताळ आकाश ॥
राबणारे संत तेच दाखवितील खरा आत्मज्ञान प्रकाश ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम 20048 दि: 5/10/2
2982 23/11/08



REFBK-0020048
REFBK-0020048
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2982 20048